**MHST200013912020**

## वि.दि.दा.क्र.२२३/२०२३ मधील निशाणी क्र.९५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्रं.३ विरुद्ध त्याने दावा मिळकतीतील परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी असा आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) अर्ज व त्यावरील म्हणणे (नि.क्रं.१००) यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३) वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा त्याने जाहिर ठराव, हुकूमात्मक ताकीद व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दि.०६.१०.२०२० रोजी वादीने न्यायालयीन आयुक्त यांच्या नेमणुकीसाठीचा अर्ज नि.क्रं.६७ वर दाखल केला होता. तो आजपर्यंत प्रलंबीत आहे. प्रतिवादींनी दाव्यात हमीपत्र दिले होते. परंतु, त्याचा भंग करुन तो दावा मिळकतीत बांधकाम करीत आहे. वादीचा दावा मिळकतीत कुळाचा हक्क आहे. वादीने नि.क्रं.५९ वर दि.१९.०३.२०२० रोजी 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा अर्ज दिला होता. सदर अर्जावर प्रतिवादी क्रं.३ याने वाद मिळकतीत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करणार नाही व परिस्थिती 'जैसे थे' ठेवली जाईल असे हमीपत्र दिले होते व त्या अनुशंगाने जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश झालेला आहे. दि.२१.११.२०२५ रोजी प्रतिवादीने वाद मिळकतीत लोखंडी अँगल, सिमेंट व अन्य बांधकामाचे साहित्य नुकतेच आणुन ठेवले आहे. वादी हा गट क्रं.६७५ मध्ये कायमस्वरुपी बांधकाम करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे, त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक आदेश देणे गरजेचे आहे. त्यामुळे, त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करावा.

४) प्रतिवादी क्रं.३ याने असे कथन केले आहे की, वादीने नि.क्रं.६५, ६७ व ७३ वर यापुर्वी तुर्तातुर्त ताकीद मागण्यासाठी व दावा मिळकतीची जैसे थे

परिस्थिती ठेवण्याचे अर्ज दाखल केले होते. त्यावर प्रतिवादीने म्हणणे दिल्यानंतर वादीने सदर अर्ज चालवणेचे नाहीत असे सांगितले. दावा मिळकतीशी वादी दादा लिंबा वाघमारे यांचा कोणताही संबंध नसुन त्यांची कब्जेवहिवाट नाही. वादीने खंडाळा येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं.२०३/२०१४ हा दिवाणी दावा दाखल करुन निरंतर ताकीद मागितली आहे. सदर दाव्यामध्ये दावा मिळकत त्याच्या कब्जात आहे असे त्याने कथन केले आहे. प्रस्तुतच्या दाव्यात वादीने प्रतिवादीकडुन दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी केली आहे. वादी हा परस्परविरोधी कथने करीत आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी क्रं.३ याने दि.१८.०८.२०१० रोजी प्रतिवादी क्रं.१ व २ यांच्याकडुन खरेदी केलेली आहे. त्यामध्ये त्याचा कब्जा व वहिवाट आहे. सदर मिळकतीत त्याने सन २०१३ मध्ये ३०४.४१ चौ. फुटाचे घर बांधलेले आहे. प्रतिवादी हा शेतमाल ठेवण्यासाठी गट क्रं.६७५ मध्ये खोल्यांचे बांधकाम करत आहे. तो दावा मिळकतीचा मालक असल्याने त्याला बांधकाम करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करावा.

५) दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकती हया वादीच्या कुळ हक्काच्या आहेत असे त्याने कथन केलेले आहे. प्रतिवादीने अभिलेखावर महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, पुणे यांच्या दि.१५.१२.२०२५ रोजीच्या आदेशाची साक्षांकीत प्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये सदर न्यायाधिकारणाने वादीचा कुळाची मिळकत खरेदी करण्याचा अधिकार संपुष्टात आला आहे असा आदेश पारीत केला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी वादी हा दावा मिळकतीचा कुळ आहे व त्याला दावा मिळकत खरेदी करण्याचा अधिकार आहे असे दिसुन येत नाही. तसेच वादीने दाव्यामध्ये प्रतिवादीने केलेले बांधकाम पाडुन मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यामध्ये कुठेही बांधकामाबाबत निरंतर ताकिदीची मागणी केलेली नाही. त्यामुळे जी मुळ मागणी केलेली नाही त्याबाबत वादीला अंतरीम अर्ज दाखल करुन मागणी करता येणार नाही असे मला वाटते. तसेच नि.क्रं.५९ वरील अर्ज हा माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी प्रतिवादीने दाखल केलेल्या हमीपत्रावर निकाली

काढलेला आहे. त्यामध्ये कुठेही परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याबाबत आदेश केलेला नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी हा खोटे कथन करीत आहे.

६) वादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या **गोविंदा भागोजी कांबळे वि. सादु बापु कांबळे, दुसरे अपील क्रं.७५५/२००४** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयातील वस्तुस्थिती ही प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीपेक्षा भिन्न असल्याने सदर न्यायनिवाडयाचा सन्मान राखुन तो या प्रकरणास लागु होत नाही असे मला वाटते.

७) तसेच वादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा.सर्वोच्च न्यायालयाच्या **रवी प्रकाश अगरवाल व इ. वि. राजेश प्रसाद अगरवाल व इ., [२००८ (१) एस सी सी आर ६९०]** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे विषद केले आहे की, ''जर बऱ्याच कालावधीकरीता परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश पारीत करण्यात आला असेल तर तो दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो सुरू ठेवणे योग्य राहील.'' प्रस्तुत प्रकरणामध्ये परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याबाबत कोणताही आदेश झालेला दिसुन येत नाही. त्यामुळे सदर न्यायनिवाडयाचा सन्मान राखुन तो या प्रकरणास लागु होत नाही असे मला वाटते.

८) वादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांची भिस्त मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **तनुश्री बासु व इ. वि. इशानी प्रसाद बासु, [२००८ (१) एस सी सी आर ६९१]** या न्यायनिवाडयावर ठेवली आहे. सदर न्यायनिवाडयातील वस्तुस्थिती ही प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीपेक्षा भिन्न असल्याने सदर न्यायनिवाडयाचा सन्मान राखुन तो या प्रकरणास लागु होत नाही असे मला वाटते.

९) प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.३ याच्या लाभात सन २०१० पासुन खरेदीपत्रानुसार महसुल दफ्तरी नोंद आहे. दावा मिळकतीत प्रतिवादीचा कब्जा आहे ही बाब वादीने नाकारलेली नाही. वादीच्या बाजुने सकृतदर्शनी प्रकरण नाही. तसेच वादीने यापुर्वी वेगवेगळया विनंतीचे बरेच अर्ज दाखल केलेले आहेत. परंतु, सदरचे

अर्ज चालविण्याची वादीची इच्छा नसुन त्याला केवळ परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश मिळविण्याची इच्छा असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

**आदेश**

(१) अर्ज (नि.९५) नामंजुर करण्यात येतो.

(२) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.01.16 17:32:03 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : १६.०१.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.